संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
संपादकीय
नवाकाळ
।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# जीवनरक्षक की जीवनभक्षक

**समाजजीवनामध्ये** एकमेकांविषयी विश्वासाचे वातावरण असेल तर सामाजिक स्वास्थ्य अधिक चांगले टिकून राहू शकते. म्हणजे समाज निरोगी राहावा असे वाटत असेल तर एकमेकांमधला हा विश्वास फार महत्त्वाचा ठरतो. दुर्दैवाने आज नेमकी त्याचीच वानवा आहे. समाजातला कोणताही घटक एकमेकांविषयी विश्वासाने बोलू शकत नाही. एकमेकांविषयी मोकळेपणाने बोलू शकत नाही. प्रत्येकाच्या मनात एकमेकांविषयी काही ना काही प्रमाणात संशय असतो. गेल्या तीस चाळीस वर्षामध्ये त्याचे प्रमाण एवढे वाढले आहे. की माणुसकी नावाचा प्रकारच समाजात शिल्लक राहिलेला नाही असे वाटायला लागते. कारण कोणीही एकमेकांना कितीही फसवण्याचा किंवा खोटं ठरवण्याचा प्रयत्न करीत असताना संवेदनशीलता किंवा माणुसकी शिल्लक राहील याची खबरदारी घेतली पाहिजे. परंतु आता तेही होताना दिसत नाही. याचे अगदी ठळक उदाहरण म्हणून वैद्यकीय किंवा आरोग्य क्षेत्राचे द्यावे लागते. तर कोणावरही विश्वास नसला किंवा श्रध्दा नसली तरी आपल्यावर उपचार करणाऱ्या डॉक्टरवर किंवा त्यांच्या दवाखान्यावर किंबहुना आरोग्य क्षेत्राशी संबंधित प्रत्येक घटकाविषयी विश्वास वाटत असतो. म्हणजे आपल्या प्रकृतीला आराम पडावा , आपला रोग बरा व्हावा. आपल्यावर योग्य ते उपचार व्हावेत. यामध्ये कोणीही आपली फसवणूक करू नये. अशी एक सर्वसाधारण अपेक्षा असते. परंतु गेल्या काही वर्षात हे वैद्यकीय क्षेत्र आणि त्याच्याशी संबंधित अनेक घटकांविषयी अविश्वास वाढू लागलेला आहे. पैसे मिळवण्यासाठी या क्षेत्रातील लोकही कोणत्या टोकाला जातील हे सांगता येत नाही. म्हणजे अगदी बोगस डॉक्टर, बोगस दवाखाने, बोगस औषधे एवढेच नव्हे तर औषध विक्रेतेसुध्दा बोगस असल्याचे पाहायला मिळते. एवढेच कशाला गंभीर परिस्थितीमध्ये रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकांदेखील बोगस असल्याचे प्रकार समोर आले आहेत. काही दिवसापूर्वी पश्चिम उपनगरात योग्य तो परवाना नसलेल्या रुग्णवाहिका पकडल्या गेल्या. तर ठाणे जिल्ह्यात जवळपास वीस बोगस औषधे विक्रेत्यांवर कारवाई केली गेली. त्यातही परराज्यातून फार्मसीची म्हणजे औषध निर्माण शास्त्राची पदवी घेऊन आलेले हे लोक मोठ्या शहरांमध्ये औषधे विक्रीची दुकाने उघडतात. पण त्यांच्याकडे असलेली ही पदवीप्रमाणपत्रे बनावट असल्याचे आढळून आले.

**सगळा बोगस प्रकार?**

जी औषधे रुग्णाला बरी करतात ती औषधे विकण्याकरिता प्रशिक्षित किंवा त्यासंबंधी ज्ञान असलेले लोक आवश्यक असतात. म्हणूनच कायद्याने औषधे निर्माण शास्त्र अशी स्वतंत्र शाखा अभ्यासासाठी निवडली गेली. एवढेच नव्हे तर या शाखेत प्रवेश घेण्यासाठी प्रवेश परीक्षाही घेतल्या जातात. कारण लोकांच्या आरोग्याशी किंवा प्रत्यक्ष जीवाशी संबंध असलेली ही औषधे योग्य पध्दतीने निर्माण झाली पाहिजेत. आणि योग्य ती पात्रता असलेल्यांकडूनच ती विकली गेली पाहिजेत. असा त्यामागचा हेतू आहे. परंतु तिथेदेखील पैसा कमावण्याची स्पर्धा निर्माण झाली. बोगस प्रमाणपत्र घेऊन औषधे विक्रीची दुकाने असणाऱ्यांचा सुळसुळाट पाहायला मिळाला. एकट्या ठाणे शहरात असे वीस लोक सापडत असतील तर ग्रामीण भागामध्ये अशांनी किती धुमाकूळ घातला असेल याचा सहज अंदाज येतो. आरोग्यासारख्या अतिशय महत्त्वाच्या क्षेत्रात इतक्या उघडपणाने किंवा कायद्याची तमा न बाळगता व्यवहार होत असतील तर लोकांनी किंवा रुग्णांनी कशावर विश्वास ठेवायचा असा प्रश्न निर्माण होतो. कारण डॉक्टरांनी दिलेली औषधे ही दुकानदार जरी विकत असले तरी ती औषधे त्याच प्रकारची किंवा त्याच दर्जाची आहेत हे सामान्य माणूस ठरवू शकत नाही. म्हणूनच डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे योग्य पध्दतीने दिली की नाही याची कायदेशीर जबाबदारी त्या औषध विक्रेत्यावर सोपवली गेली आहे. पण आता तर तो औषध विक्रेताच बोगस असेल तर मिळणारी औषधे कितपत खात्रीशीर आहेत याबद्दलच प्रश्न निर्माण होतात. महाराष्ट्र सरकारने यावरचा उपाय म्हणून अशा औषध विक्रेत्यांसाठी एक परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे.

**अन्य राज्यात काय असेल**

पूर्वी ही परीक्षा घेतली जात होती परंतु औषध विक्रेत्यांकडे सर्टिफिकेट असतात. मग ही वेगळी परीक्षा देण्याची गरज नाही असा युक्तिवाद केला गेला आणि ही परीक्षा बंद झाली. प्रामुख्याने परराज्यातून आलेले आणि फार्मसीची पदवी घेतलेले हे लोक खोटी किंवा बनावट प्रमाणपत्र घेऊन येतात असे आढळून आले वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित ही गोष्ट म्हणजे त्या क्षेत्राविषयी घडणारी ही गोष्ट आधीच त्या क्षेत्राविषयी निर्माण झालेल्या अविश्वासामध्ये भर घालणारीच ठरते. समाजजीवनातल्या आरोग्यासारख्या या एकाच महत्वाच्या क्षेत्रात एकाचवेळी जेव्हा अनेक बोगस प्रकार चालतात. तेव्हा कोणालाही धक्का बसतो. कारण रुग्णाला वाचवणारा डॉक्टर हा जणू देवमाणूस असल्याची लोकांमध्ये भावना असते. गेल्या काही वर्षात डॉक्टरांपासून ते औषध विक्रेत्यांपर्यंत सगळ्या ठिकाणी माणुसकी शून्य व्यवहार होत आहेत. आणि हे क्षेत्र उलटे बदनामही झाले. जर इतक्या बेदरकारपणाने लोकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असेल तर समाज जीवनाचे स्वास्थ्य कोणामुळे बिघडते आहे हे स्पष्ट होते. आज सामान्य माणूस यासाठीच संभ्रमात आहे अन्य क्षेत्रांमध्ये चालणारी बोगसगिरी तो एकवेळेला समजून घेऊ शकेल परंतु आरोग्य किंवा वैद्यकीय क्षेत्रातला हा माणुसकी शून्य व्यवहार त्याच्या सहनशीलतेच्या पलीकडे जातो. सुदैवाने महाराष्ट्रासारख्या राज्यात थोडीफार उपाययोजना तरी होताना दिसते. परंतु ज्या राज्यात अशा बोगस पदव्या वाटल्या जातात. त्या राज्यांची दुरवस्था असेल याची आपण सहज कल्पना करू शकतो. ही भविष्यकाळात जीवनरक्षक औषधे विकणारे हे जीवनभक्षक सर्वाधिक ठरतील त्यांना आतापासूनच विविध पध्दतीने रोखले गेले पाहिजे.